# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 January 2026

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- मनपा निवडणूक निकालाचं चित्र स्पष्ट–भाजप आणि मित्रपक्षांची सरशी
- राज्यात अनेक पक्षांची राजकीय समीकरणं अपेक्षेच्या तुलनेत अयशस्वी
- मराठवाड्यात भाजप तीन तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा प्रत्येकी एका मनपावर विजय
- `स्टार्टअप इंडिया मिशन` उपक्रमाची दशकपूर्ती
- हिंदू समाजाने आचरणातून समाज परिवर्तन घडवावं–सरसंघचालकांचं आवाहन

आणि

- धनगर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जालना आणि अंबड शहरात संचारबंदी

****

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या मित्रपक्षांनी सर्वाधिक म्हणजे २३ जागांवर विजय मिळवला. मुंबई महापालिकेत भाजपने सर्वाधिक ८९ जागा तर शिवसेनेने २९ जागा जिंकल्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ६५ जागा तर काँग्रेसने २४ जागा जिंकल्या. राष्ट्रवादी काँग्रेसने ३ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने फक्त १ जागा जिंकली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अवघ्या ६ जागांवर यश मिळालं.

नवी मुंबई, पनवेल, मीरा भाईंदर, ठाणे, उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, इचलकरंजी, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली, नागपूर, अमरावती, अकोला, धुळे, जळगाव आणि नाशिकसह मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना आणि नांदेड महानगरपालिकेच्या निवडणुकीतही भाजप आणि मित्रपक्षांनी दणदणीत यश मिळवलं.

काँग्रेस पक्षाने लातूर, भिवंडी, चंद्रपूर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने परभणी, बहुजन विकास आघाडीने वसई विरार तर इस्लाम पार्टीने मालेगाव महानगरपालिकेवर विजय मिळवला आहे.
या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक राजकीय पक्षांनी जुळवलेली समीकरणं जनतेने नाकारल्याचं कालच्या निकालातून दिसून आलं. अनेक ठिकाणी सत्तापालट झाला, तर अनेक ठिकाणी प्रस्थापित पक्षांना सत्ता कायम ठेवण्यात यश मिळालं.

****

महाराष्ट्रातल्या जनतेने राष्ट्रीय लोकशाही आघाडी–एनडीएच्या सुशासनाच्या धोरणाला आशीर्वाद दिले असून एनडीएसोबतचं नातं आणखी दृढ केल्याची प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. केंद्रीय मंत्री अमित शहा तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांनीही भाजप–शिवसेना कार्यकर्त्यांचे अभिनंदन केलं.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई भाजपा कार्यालयात झालेल्या सोहळ्यात विजयी उमेदवारांना शुभेच्छा देत, जनतेनं दाखवलेल्या विश्वासावर खरं उतरण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

काँग्रेस पक्ष राज्यात सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून समोर आला आहे. राज्यात १० ठिकाणी काँग्रेस सत्तेत सहभागी होईल, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं. ते काल बुलडाणा इथं बोलत होते.

****

मराठवाड्यातल्या मतदारांनी महापालिकेच्या निवडणुकीत राजकीय पक्षांना संमिश्र कौल दिला. पाच महापालिकांपैकी भाजपला तीन तर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला प्रत्येकी एका महापालिकेत बहुमत मिळालं आहे.
छत्रपती संभाजीनगर इथं मनपाच्या ११५ जागांपैकी भाजपला ५७ तर शिवसेनेला १३ जागा मिळाल्या आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सहा, वंचित बहुजन आघाडीला चार, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला प्रत्येकी एक जागा मिळाली. छत्रपती संभाजीनगर मनपात एमआयएम पक्षाला राज्यात सर्वाधिक ३३ जागा मिळाल्या आहेत.

महापालिका निवडणुकीत जनतेनं दिलेला कौल स्वीकारत असल्याचं, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी बोलत होते. जनमताचा आदर करत असल्याचं दानवे यांनी सांगितलं. ते म्हणाले..

**बाईट – अंबादास दानवे**

पहिल्यांदाच निवडणूक झालेल्या जालना महापालिकेची सत्ता भारतीय जनता पक्षाने मिळवली आहे. ६५ सदस्य संख्या असलेल्या या महापालिकेत भाजपने ४१ तर शिवसेनेने १२ जागा जिंकल्या. काँग्रेसला नऊ, एमआयएम दोन तर एका जागेवर अपक्ष उमेदवाराने विजय मिळवला.

परभणी महापालिकेच्या ६५ जागांपैकी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सर्वाधिक २५ जागांवर विजय मिळाला, भाजपला १२, काँग्रेसला १२, राष्ट्रवादी काँग्रेसला ११ तर इतर पाच जागांवर अपक्ष उमेदवारांनी विजय मिळवला.

७० सदस्य संख्या असलेल्या लातूर मनपात काँग्रेसनं ४३ जागा जिंकल्या, तर वंचित बहुजन आघाडीला ०४ जागांवर विजय मिळाला. भारतीय जनता पक्षाला २२ तर राष्ट्रवादी काँग्रेसने एका जागेवर विजय मिळवला.

नांदेड महापालिकेच्या ८१ जागांपैकी भाजपला सर्वाधिक ४५ जागांवर विजय मिळाला, एमआयएमने १३, काँग्रेस १२, वंचित बहुजन आघाडी पाच, शिवसेना चार, राष्ट्रवादी काँग्रेस एक, तर एका जागेवर अपक्ष उमेदवाराने विजय मिळवला.

राजकीय विश्लेषक प्राध्यापक नामदेव कराड यांनी मराठवाड्यातल्या या निकालाबाबत बोलतांना, इथल्या मतदारांनी आपली पारंपरिक बांधिलकी जपत मतदान केल्याचं मत नोंदवलं. ते म्हणाले---

**बाईट – प्राध्यापक नामदेव कराड**

****

छत्रपती संभाजीनगर इथे तीन प्रभागातल्या मतमोजणी दरम्यान मतदान यंत्रावरच्या तारखेत फरक असल्याचा दावा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार अभय टाकसाळ यांनी केला आहे. या प्रभागांत फेरमतदान घेण्याची मागणी टाकसाळ यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे.

****

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं हज यात्रेकरुंना नियमांची पूर्तता करण्यासाठी २५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. ही अंतिम मुदतवाढ असून, यानंतर कुठल्याही परिस्थितीत ती पुन्हा वाढवली जाणार नाही, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

****

देशातल्या नवउद्योजकांना प्रोत्साहन देणारा `स्टार्टअप इंडिया मिशन` या उपक्रमानं गेल्या दहा वर्षांत क्रांती घडवून आणली असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या उपक्रमाला आज दहा वर्ष पूर्ण झाली. यानिमित्त काल नवी दिल्लीत भारत मंडपम इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम झाला. यावेळी बोलतांना, आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

हिंदू समाजाने स्वतःच्या आचरणातून समाज परिवर्तन घडवून आणण्याचं आवाहन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गंगापूर इथं काल हिंदू संमेलनात ते बोलत होते. जगाला हेवा वाटेल असा चारित्र्यसंपन्न बलशाली समाज आपल्याला घडवायचा आहे, त्यासाठी आपला स्वभाव आणि आचरण तसं करावं लागेल, असं डॉ भागवत यांनी नमूद केलं.

दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं एमआयटी महाविद्यालयात झालेल्या युवा संमेलनातही भागवत यांनी काल मार्गदर्शन केलं. ज्ञान घेण्यासाठी विदेशात जा, मात्र त्या ज्ञानाचा भारतासाठी वापर करा, असं आवाहन भागवत यांनी तरुणांना केलं.

****

धनगर समाजाला अनुसुचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यात यावं या मागणीसाठी मुंबईत आझाद मैदानावर नियोजित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जालना आणि अंबड शहरात आज संचारबंदी लागू करण्यात आली आहे. जालन्याच्या जिल्हाधिकारी आशिमा मित्तल जालना यांनी याबाबत आदेश दिले आहेत. धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे यांना या आंदोलनासाठी परवानगी नाकारण्यात आली आहे, मात्र त्यांच्यासह धनजर समाज आज मुंबईसाठी रवाना होण्याच्या तयारीत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही संचारबंदी जाहीर करण्यात आली. आज पहाटे ५ वाजेपासून ही संचारबंदी लागू झाली असून आज रात्री १२ वाजेपर्यंत ती लागू राहणार आहे.

****

महिलांसाठी ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करणारे महाराष्ट्र हे देशात पहिलं राज्य ठरलं असल्याचं, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करण्यात आलं आहे. प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, हाच यामागचा उद्देश असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

****

धाराशिव नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक अक्षय संजीव ढोबळे यांची निवड झाली. काल नगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत ही निवड करण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शार्ङ्गदेव महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. ओडिशी नृत्य सादरीकरणाने महोत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर अवधूत गांधी आणि सहकाऱ्यांनी वारकरी परंपरेतील अभंग, भारूड तसंच गोंधळ सादर करण्यात आला. महात्मा गांधी अभिमत विद्यापीठातील महागामी संस्थेत परवा १९ तारखेपर्यंत आयोजित या महोत्सवात दररोज विविध कला सादरीकरण, चर्चासत्र, कार्यशाळा तसंच शोधनिबंधांचं सादरीकरण होणार आहे.

****

शीख धर्मियांचे नववे गुरू श्री तेगबहादूर साहेब यांच्या साडे तीनशेव्या हौतात्म्य शताब्दी वर्षानिमित्त आयोजित ‘हिंद दी चादर’ या कार्यक्रमाच्या तयारीचा, काल विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आढावा घेतला. या ऐतिहासिक तसंच प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी दक्षतेने तसंच समन्वयाने काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नांदेड इथं २४ आणि २५ जानेवारीला हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल जिल्हा परिषदेच्या वेरुळ सभागृहात आरोग्य अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आणि त्यांच्या पालकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होणे आवश्यक असून त्यासाठी महिला बालविकास, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे ही जनजागृती करावी, असे निर्देश दिले.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी कालपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत. २१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने यासाठी अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील. याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल आणि मतदान चिन्ह वाटप होईल. ३ तारखेला मध्यरात्रीपर्यंत उमेदवारांना प्रचार करता येईल आणि ५ फेब्रुवारीला सकाळी साडे ७ ते साडे ५ दरम्यान मतदान होणार असून ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

****

सायबर गुन्हेगारीतून मिळवलेल्या १ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची अफरातफर केल्या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण संस्था सीबीआयने पंजाब अँड सिंध बँकेच्या व्यवस्थापकासह १८ जणांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. बँकेच्या केवायसीचे खोटे दस्तऐवज बनवून राजस्थानमधल्या एका बँकेच्या शाखेत १३ कंपन्यांच्या नावे बनावट खाती उघडण्यात आली. या खात्यांमध्ये बेकायदेशीर मार्गांनी मिळवलेली रक्कम हस्तांतरित करण्यात आली होती. या खात्यांमधून बेकायदेशीर पद्धतीने मोठ्या रकमेचे व्यवहार करण्यात आले होते. त्यामुळे सीबीआयने तक्रार दाखल केली आहे.

****

भारतीय खुल्या बॅटमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेनचा उपांत्यपूर्व फेरीत तैवानच्या लीन चून यी याने पराभव केला. यासोबतच लक्ष्य सेनचं या स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं, भारताचे इतर सर्व बॅडमिंटनपटू यापूर्वीच स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.

****

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत काल रॉयल चैलेंजर्स बेंगलुरु गुजरात जायंट्स चा ३२ धावांनी पराभव केला. बेंगलुरु च्या १८३ धावांच्या आव्हानांचा पाठलाग करताना गुजरातचा संघ १९व्या षटकात सर्वबाद १५० धावाच करु शकला. ४७ चेंडूंमध्ये ६६ धावा करणारी रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरुची राधा यादव सामनावीर ठरली.

****

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात होणाऱ्या `ॲट होम` या स्वागत समारंभासाठी नांदेड इथले सर्पदंश तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. त्यांच्यासोबत जळगावचे अरविंद गुलाब चौधरी, मुंबईचे स्टार्टअप उद्योजक आकाश शहा आणि रायगड सगुणा बागचे चंद्रशेखर भडसावळे यांनाही या कार्यक्रमाचं विशेष निमंत्रण पाठवण्यात आलं आहे.

****